# प्रेस नोट

दिनांक -०५/०१/२०१९

## स्थानिक गुह्रे अन्वेषण शाखेची अवैध दारु वाहतुकीवर धडक कारवाई.

---

श्री. दिक्षीतकुमार गेडाम, पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग व श्री.निमित गोयल , अपर पोलीस अधीक्षक यांनी सिंधुदुर्ग जिल्हयातील अवैध दारु विक्री व वाहतुक यांचेवर कडक कारवाई करण्यासाठी आदेश देण्यात आलेले होते त्यानुसार स्थागुअशा कडील अधिकारी यांनी गोपनिय माहिती काढुन पोलीस निरीक्षक प्रल्हाद पाटील यांचे मार्गदर्शनाखाली एक पथक तयार करुन मुंबई गोव हायवेवर गस्त घालण्यात येते होते, दरम्याने मिळालेल्या गोपनिय माहिती नुसार स्थानिक गुन्हे शाखेचे एक पथक सावंतवाडी माळगाव पुलाचे खाली वॉच करीत असताना स्विफ्ट गाडी क्र एम.एच/४३/व्ही/२२६७ हि मळगाव पुलाजवळ आली असता थांबविण्याचा प्रयत्न केला असता ति निघुन गेली तेव्हा सदर गाडीचा पाठलाग करुन ती पिंगुळी तिठा येथे थांबविण्यात आली. सदर गाडीची पाहणी करता सदर गाडीत २,६७,८४०/- रु किमतीची गोवा बनावटीची उंची कंपनिची दारु असल्याचे निष्पन्न झाले.

सदर कारवाई मध्ये वाहनासह एकुण ५,६७,८४०/- रु किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला असुन आरोपीस यास अटक करुन अधीक तपासाकरीता कुडाळ पोलीस ठाण्यात हजर करण्यात आलेले आहे.

सदर कारवाईमध्ये पोलीस निरीक्षक प्रल्हाद पाटील याचे मार्गदर्शनाखाली रविराज फडणीस पोलीस उपनिरीक्षक, अनुप खंडे, रवि इंगळे, ज्ञानेश्वर कांदळगावकर, अमित तेली यांनी विशेष कामगिरी केली आहे.

---

पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग करीता